# मतदारांची उदासीनता : भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान

**प्रा.पारडे राजू लिंबाजी** संत तुकाराम महाविद्यालय, परभणी.

---

**प्रस्तावना :-**

भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला आहे. भारताची लोकशाही ही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी आहे असे मानले जाते. भारताने संघराज्य शासन व्यवस्थेचा स्विकार केला असून त्यामध्ये संसदीय लोकशाही सक्षम व सुदृढ ठेवण्यासाठी शासनव्यवस्थेचे विभाजन केंद्र शासन, राज्यशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये विभाजित करण्यात आले आहे. या सर्व शासन संस्थामध्ये जनता आपले लोकप्रतिनिधी निवडणूकीच्या माध्यमातून पाठवत असते. यासाठी प्रत्येक स्तरावर निवडणूका घेतल्या जातात. प्रत्येक शासन संस्थेच्या निवडणूका दर पाच वर्षांनी होत असतात. संपूर्ण देशभरामध्ये विविध स्तरावर निवडणूकांचा कार्यक्रम होतो. यामधून जनता शासननिर्मिती करते आणि राज्य कारभार आपल्या लोकप्रतिनिधी मार्फत चालवला जातो. "लोकशाही शासनव्यवस्था म्हणजे लोकांनी लोकांचे लोकांकरीता चालवलेले राज्य होय"

वरील व्याख्येनूसार लोकशाही सक्षम व सुदृढ ठेवण्यासाठी निवडणूकांमध्ये सर्व मतदारांनी सहभाग नोंदवून आपले प्रतिनिधी निवडणे आवश्यक असते. मात्र आज भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाले तरीही अपेक्षित मतदानाची टक्केवारी मिळवण्यात अपयश येत आहे. लोकशाही सक्षम करण्यासाठी इतर चर्चासोबत याकमी मतदानाच्या प्रमाणाचाही सर्व बाजूने विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**अभ्यास विषयाचे महत्व ः-**

लोकशाही शासनव्यवस्थेत जनता आपले लोकप्रतिनिधी निवडते. या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनता शासनात सहभागी होते. लोकप्रतिनिधींची निवड करण्यासाठी निवडणूक आयोगाद्वारे निवडणूक कार्यक्रम राबवले जातात. लोकशाही सुदृढ, सक्षम व बळकट करायची असेल तर मतदार म्हणून नोंद केलेल्या प्रत्येक व्यक्तीने आपला मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. पण आजही अनेक ठिकाणी 'मतदार' अपेक्षेप्रमाणे मतदान करत नाहीत. त्यामुळे मतदानाचे प्रमाण कमी दिसून येते. म्हणून मतदारांच्या मतदान न करण्यामागची कारणे शोधून त्यावर उपाय योजना करण्यासाठी आणि सर्व जनतेने जास्तीत जास्त प्रमाणात मतदानात भाग घेऊन लोकशाही सक्षम करण्यासाठी सदरील संशोधन विषयाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये ः-**

1) लोकशाही संकल्पनेचा अभ्यास करणे.

2) मतदारांच्या उदासीनतेचा अभ्यास करणे.

3) मतदारांच्या निवडणुकीत मतदान न करण्याच्या कारणांचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहितके ः-**

1) निवडणूकीत मतदारांची उदासीनता आहे.

2) मतदारांमध्ये मतदानाप्रती राजकीय जागृतीचा अभाव आहे.

**संशोधन पध्दती :-**

मतदारांच्या मतदानातील उदासीनतेचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीसह, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दती◌ाच वापर करण्यात येणार आहे.

**लोकसभा निवडणुकीतील मतदानाचे प्रमाण-**

भारताने संघराज्य शासन पध्दतीचा स्विकार केला असल्याने केंद्रात केंद्र शासन व राज्यात राज्यशासन अशा दोन भागात शासनाचे वर्गीकरण केले आहे. भारताने संसदीय शासनपध्दतीचा स्विकार केलेला आहे. यामध्ये लोकसभा व राज्यसभा या दोन सभागृहाचा समावेश होतो. त्यापैकी लोकसभा हे संसदेचे कनिष्ठ सभागृह असून त्याला संसदेचे प्रमुखगृह असे संबोधले जाते. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे ते सभागृह होय. लोकसभेतील सदस्यांची निवड गुप्त व प्रौढ मतदान पध्दतीने जनतेकडून होत असते. लोकसभा गृहाची सदस्य संख्या 545 असल्याने लोकसंस्थेच्या प्रमाणात देशभरात मतदार संघ निर्मिती करून प्रत्येक मतदार संघातून एक प्रतिनिधी निवडल्या जातो. त्यासाठी निवडणुक घेतली जाऊन सर्वात जास्त मते मिळवणारा उमेदवार प्रतिनिधी म्हणून निवडला जातो. परंतू भारताला स्वातंत्र्य प्राप्ती होऊन 75 वर्षे पूर्ण होत आलेली असतांनाही मतदानाचे प्रमाण 70% पुढे गेले नाही. 1952 पासून 2019 पर्यंत 17 लोकसभा निवडणूका झाल्या. त्या प्रत्येक लोकसभेतील मतदानाचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे.

| लोकसभा निवडणुक | मतदानाचे प्रमाण |
|---|---|
| १९५२ | ४४.६७ % |
| १९५७ | ४५.४४ % |
| १९६२ | ५५.४२ % |
| १९६७ | ६१.०४ % |
| १९७१ | ५५.२७ % |
| १९७७ | ६०.४९ % |
| १९८० | ५६.९२ % |
| १९८४ | ६३.५६ % |

| लोकसभा निवडणुक | मतदानाचे प्रमाण |
|---|---|
| १९८९ | ६१.९५ % |
| १९९१ | ५६.७३ % |
| १९९६ | ५७.९४ % |
| १९९८ | ६१.९७ % |
| १९९९ | ५९.९९ % |
| २००४ | ५८.०७ % |
| २००९ | ५८.२१ % |
| २०१७ | ६६.३० % |
| २०१९ | ६७.०४ % |

वरील प्रमाणे लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारांनी सहभाग नोंदवला तरी मात्र 35 ते 40 % मतदारांनी निवडणुकीत भाग घेतला नसल्याचे दिसुन येते.

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील मतदानाचे प्रमाण -**

महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली. महाराष्ट्र राज्यामध्येही विधानसभा व विधानपरिषद ही द्विगृही सभागृहे अस्तित्वात आहेत. त्यापैकी विधानसभा हे सभागृह लोकप्रतिनिधींचे सभागृह म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या 288 सदस्यांसाठी 288 मतदार संघाची निर्मिती करून त्याद्वारे निवडणुकीद्वारे जनता आपले लोकप्रतिनिधी महाराष्ट्राच्या निधानसभेत पाठवले जातात. परंतू महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन आज 60 वर्ष पुर्ण झाली तरी प्रगत असलेल्या राज्यानेही मतदानाची अपेक्षित टक्केवारी गाठू शकली नाही. महाराष्ट्राच्या प्रत्येक विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांच्या सहभागाचे प्रमाण पुढील प्रमाणे होते.

| विधानसभा निवडणुक | मतदानाचे प्रमाण |
|---|---|
| १९६२ | ६०.३६ % |
| १९६७ | ६४.८४ % |
| १९७२ | ६०.६३ % |
| १९७८ | ६७.५९ % |
| १९८० | ५३.३० % |
| १९८५ | ५९.१७ % |
| १९९० | ६२.२६ % |

| लोकसभा निवडणुक | मतदानाचे प्रमाण |
|---|---|
| १९९५ | ७१.६९ % |
| १९९९ | ६१.९५ % |
| २००४ | ६३.४४ % |
| २००९ | ५९.५० % |
| २०१४ | ६३.०८ % |
| २०१९ | ६१.०१ % |

अशा प्रकारे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतही जवळपास 30 ते 35 % मतदारांनी आपला सहभाग नोंदवला नसल्याचे दिसून येते.

**मतदानाच्या कमी प्रमाणाचे परिणाम-**

लोकशाही सक्षम करण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदान करणे आवश्यक आहे. मात्र भारताच्या स्वातंत्र्यास 75 वर्ष पूर्ण झाले तरी अपेक्षित मतदानाचे प्रमाण न गाठल्यामुळे मतदानाच्या कमी टक्केवारीचे परिणाम पुढील प्रमाणे दिसून येतात.

**1) लोकशाही कमकुवत -**

मतदानाचे प्रमाण कमी झाल्याने निवडून येणारा उमेदवार हा एकूण झालेल्या मतदानापैकी सर्वात जास्त मते मिळवून विजयी जरी झाला तरी मात्र त्याला एकूण मतदारांच्या 25 ते 30 टक्के एवढेच मतदान प्राप्त होते. म्हणून या ठिकाणी विजयी उमेदवार हा बहुसंख्य जनतेने निवडून दिला तर लोकशाही सक्षम बनू शकते.

**2) भ्रष्टाचारामध्ये वाढ-**

कमी मतदानाच्या प्रमाणामुळे विजयी उमेदवार भ्रष्टाचारास बळी पडण्याची शक्यता जास्त असते. स्थानिक मतदारांवर नाराजी कामामध्ये उदासीनता ही त्यांच्या भ्रष्टाचाराची कारणे असू शकतात.

**3) बहुसंख्याकांचे वर्चस्व –**एखाद्या मतदार संघात मतदानाचे प्रमाण कमी झाले तर त्या ठिकाणी जात, धर्म अथवा भाषावादी बहुसंख्याकांचे वर्चस्व प्राप्त होऊ शकते. त्यामुळे त्या भागातील अल्पसंख्याकावर अन्याय होण्याची शक्यता असते.

**4) मतदार संघातील समस्यांकडे दुर्लक्ष -**

मतदानाचे प्रमाण कमी होत असल्याने निवडून आलेला लोकप्रतिनिधी मतदार संघातील जनतेकडे, समस्यांकडे दुर्लक्ष करण्याचा धोका अधिक प्रमाणात दिसून येतो. म्हणून मतदानाचे प्रमाण अधिकाधिक असणे गरजेचे आहे.

**मतदारांच्या ा उदासीनतेची कारणे -**

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सर्व जनतेला सहभागी होता यावे यासाठी सर्व मतदारांनी मतदानात सहभागी होणे आवश्यक आहे. असे असले तरी मतदानाचे प्रमाण हे कमी आढळून येते. त्यामागची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**1) राजकीय जागृतीचा अभाव -**

भारतीय लोकशाही मध्ये मतदारांनी मतदान करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व मतदारांना मतदानाचे महत्व, मतांचे मुल्य, शासन निर्मिती प्रक्रिया, मतदारांची कर्तव्ये, नागरीकांचे कर्तव्य याबाबत नागरिकांमध्ये जागृतीचा अभाव दिसून येतो. त्यामुळे जनतेला मतदानाचे महत्व. मतांचे मुल्यांची जाणीव नसल्याने मतदानाचे प्रमाण कमी आढळून येते.

**2) मतदारांचे स्थलांतर -**

ज्या ठिकाणी मतदानाचे प्रमाण कमी आहे. त्या भागातील मतदारांचे स्थलांतर झाल्याचे दिसून येते. अनेक मतदार, व्यवसायाच्या निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने, शिक्षणाच्या निमित्ताने अथवा कामाच्या निमित्ताने तात्पुरत्या स्वरूपाचे स्थलांतर झाल्याने मतदानाच्या दिवशी ते त्या ठिकाणी हजर नसल्याने मतदान करत नाही. मतदानाचे टक्केवारी कमी होण्याचे स्थलांतर हे प्रमुख कारण आहे.

**3) मतदान न करणाऱ्यांमध्ये वयोवृध्दांचे प्रमाण जास्त -**

मतदार मतदान करत नाहीत. त्यापैकी अनेक जण वृध्द, शारीरिक दृष्टीने थकलेले असल्याने ते मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकत नसल्याने मतदानाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते. वृध्दांमध्ये शारीरिक क्षमता कमी झाल्याने त्यांना मतदान करण्यात समस्या निर्माण होतात.

**4) शासनाप्रति उदासीनता -**

अनेक मतदारांमध्ये मतदान न करण्यामागची कारणांपैकी एक कारण शासनाप्रति असलेली उदासीनता दिसून येते. कोणतेही शासन सत्तेत आल्यानंतर त्यांनी केलेल्या आश्वासनांची पुर्तता न केल्याने जनता उदास व दुःखी होते. याचा परिणाम म्हणून अनेक मतदार मतदान करण्यास अनुत्सूक असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

फ्रेंच राजकीय तत्वज्ञ मॉन्टेस्क्यू याने 18 व्या शतकात म्हटले होते की, एखाद्या जुलमी राजेशाहीतील राजाचा जुलूम देखील लोकशाहीतील नागरीकांच्या सार्वजनिक कल्याणाबाबतच्या उदासीनते एवढा घातल नसतो. मतदार बेफिकीर राहिले की त्यांच्या नशिबी वाईट सरकार येणे अगदी अपहार्यच असते. त्यामुळे मतदानाचा कमी प्रमाणामुळे लोकशाही विरोधी प्रवृत्तीचा उदय होत आहे. याचा परिणाम म्हणून समृध्द लोकशाही मोडकळीस येत आहे. हे सर्व थांबवण्यासाठी सर्व मतदारांनी मतदानात उत्स्फुर्त सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. कमी मतदानाच्या समस्यांचा शोध घेऊन त्यांचे निवारण करणे गरजेचे आहे. याकामी मतदारांमध्ये राजकीय जागृतीचे कार्यक्रम मोठया प्रमाणात राबवावे लागतील. निवडणुका होण्यासाठी भयमुक्त वातावरण निर्माण करून मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी अनेक उपाय करणे गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ सुची**

01) प्रा.वि.ल.एरंडे - भारतीय लोकशाही : अपेक्षा आणि वास्तव- निर्मल प्रकाशन, नांदेड.

02) डॉ.अल्का देशमुख- भारतीय शासन आणि राजकारण - श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर.

03) प्रा.राजशेखर सोलापूरे- भारतीय शासन आणि राजकारण - अरूणा प्रकाशन, लातूर

04) प्रा.सुधाकर कुलकर्णी - भारतीय संविधान- शासन आणि राजकारण- अभिजित पब्लिकेशन, लातूर.

05) शिंदे य.ग.- महाराष्ट्र विधानसभा निवडणूक - चंदन प्रकाशन, पुणे.

06) जावळे बी.जी.-लोकशाहीचे भवितत्व- डोळस प्रकाशन, बीड.

07) कुंभार नागोराव- लोकशाही : स्वरूप व समस्या-प्रबोधन प्रकाशन, लातूर.

वेबसाईट –

- www.eci.gov.in,
- https://mahasec.maharashtra.gov.in
- https://ceo.maharashtra.gov.in,